सुमित्रा आत्माराम जाधव वि.

पांडूरंग बुधाजी जाधव

## निशाणी क्रमांक २५ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे अर्जदार यांनी मयत वादी क्र.१ विरूध्द झालेला अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील वादी क्र.१ ही दिनांक ११/१२/२०२१ रोजी मयत झाली आहे. तिचे वारस अभिलेखावर दाखल करणे आवश्यक होते, परंतु अर्जदार यांना याची माहिती नसल्याने वादी क्र.१ हीचे वारस मुदतीत दाखल करता आले नाहीत. त्यामुळे वादी क्र.१ हीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब जाणीवपूर्वक केलेला नाही. त्यामुळे अर्जदारने प्रस्तुत अर्जाद्वारे वादी क्र.१ विरूध्द झालेला आबेटचा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा विलंब हा जाणीवपूर्वक केलेला असलेलेन अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. अर्जदार व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द कायमची ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदारने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. वादी क्र.१ विरूध्द सदरचा दावा अबेट झालेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच, नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत वादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्जदारचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) इतक्या खर्चाने मंजुर करणेत येत आहे.

२. वादी क्र.१ विरूध्द झालेला आबेटचा आदेश रद्द करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- २०/०२/२०२४ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी.

**Certificate**

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | U. B. Hundekar (Grade-3) |
| Court | :- | Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Sawantwadi |
| Date | :- | 20/02/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 22/02/2024 |
| Judgment/Order uploaded on | :- | 22/02/2024 |